मार्गदर्शक सुचना

जा.क्रकृआ/विप्र.-४/शे.नि.पु./मा.सू.२०१२/१५१/२०१३
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,कृषि भवन,
पुणे- ५, दिनांक :-०८/०३/ २०१३

प्रति ,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- सन २०१२ करीता वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कारासाठी शेतक-यांच्या निवडीबाबत शिफारस प्रस्ताव पाठविणेबाबत...

संदर्भ :- १) कृषि व पदुम विभाग, क्र. शासन निर्णय क्र. २१/२०००/११अे दिनांक १ नोव्हेंबर २०००
२) कृषि व पदुम विभाग, क्र. शासन निर्णय क्र.कृसंप्र-२१९३/सीआर-११६/११-अे दि.२७ मे १९९४

राज्य शासनाकडुन दरवर्षी शेतीनिष्ठ शेतक-यांची निवड करून त्यांचा सत्कार करण्यात येतो. शेतीनिष्ठ शेतकऱ्यांच्या निवडीसाठी तालुका व जिल्हा स्तरीवरील समित्या आपले स्तरावरून गठीत करण्यात येतात. तालुकास्तरीय निवड समिती खालील प्रमाणे असावी.

**अ) तालुका स्तरीय समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) | तालुका कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २) | पंचायत समिती मधील कृषि अधिकारी | सदस्य सचिव |
| ३) | दोन मंडळ कृषि अधिकरी | सदस्य |
| ४) | पशुधन अधिकारी | सदस्य |
| ५) | तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक | सदस्य |

**तालुकास्तरीय समितीने करावयाचे कामकाज :-**

१. प्रत्येक समिती स्तरावर आदिवासी (जेथे संबंधीत आहे तेथे) आणि सर्वसाधारण गट प्रत्येकी एक याप्रमाणे शिफारस करावयाची आहे. तसेच शिफारस पाठविताना भटक्या व मागास वर्गीय जमातीतील शेतकऱ्यांचाही प्रस्ताव पाठवावा.

२. शिफारस केलेल्या शेतकऱ्यांची पुढील दोन प्रकारची प्रपत्रे सादर करावीत.

अ) यामध्ये संबंधीत शेतकऱ्याच्या वैयक्तिक माहितीचा समावेश आहे.

ब) यामध्ये शेतकऱ्याने आपल्या शेतीची (सुधारीत प्रपत्र शासन निर्णय दिनांक २७.५.१९९४ नुसार) स्वप्रयत्नांने कशी सुधारणा केली याबाबतच्या माहितीचा समावेश आहे.

उपरोक्त दोन्ही प्रपत्रे काळजीपूर्वक व बिनचूक भरावीत. या सुचनेचे कटाक्षाने पालन होण्याच्या दृष्टीने ही दोन्ही प्रपत्रे समितीचे अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्याने स्वाक्षरी व दिनांकासह प्रमाणित करावीत.

३. अ नमुना प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत सादर करावे.

४. शासन निर्णय दि.२७.५.९४ नुसार शेतकऱ्यांना वेगवेगळया मु"दयावर गुण देण्यात यावेत व त्याप्रमाणे गुणांचा तक्ता भरावा.

५. सादर केलेला प्रस्ताव आणि त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यावर उक्त समितीचे अध्यक्ष अथवा सदस्यसचिव यांचेपैकी एकाची सुध्दा तारखेसह सही नसेल अथवा प्रस्ताव अपूर्ण असेल तर असा प्रस्ताव फेटाळण्यात यावा. तो फेटाळल्यानंतर उक्त प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अपील दाखल करुन घेतले जाणार नाही, हे सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणावे.

**ब) जिल्हा स्तरीय निवड समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हा कृषि विषयक समिती चे सभापती. | अध्यक्ष |
| २) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ३) | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| ४) | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

**समितीने करावयाचे कामकाज :-**

१) तालुकास्तरीय निवड समितीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी करावी.

२) प्रस्तावातील शेतकऱ्यांच्या शेतीवर अध्यक्षासह सर्व सदस्यांनी एकत्रितरित्या भेटीचा दौरा कार्यक्रम आखावा, आणि तो मान्य झाल्यावर एकत्रितरित्या प्रस्तावित शेतकऱ्यांच्या शेतीस भेट

दयावी आणि शेतीची पहाणी करावी. त्यांच्या शेतीबाबत असलेली आधारभूत माहिती तपासावी. शेतकऱ्यांच्या नावांवर शेती आहे आणि तो व त्यांचे कुटुंबीय स्वतः जातीने शेती करतात, याची खात्री करावी. प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकरी हा शेतीस पुरक धंदा व्यतिरिक्त इतर कोणताही धंदा व नोकरी करीत नाही याची खात्री करावी. शेतकऱ्यांस वेगवेगळया मुदयांवर जे गुण दयावयाचे ते गुण त्या शेतकऱ्यांच्या शेतात समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी स्वतंत्ररित्या दयावेत. गुणांची बेरीज तपासावी. गुणवत्ता तक्त्यातील प्रत्येक पृष्ठ स्वतंत्ररित्या तारखेसह सही करुन प्रमाणित करावे. त्यानंतर हा गुणवत्ता तक्ता निवड समितीचे अध्यक्ष व प्रत्येक सदस्यांने वेगवेगळया पाकीटात घालून सिलबंद करुन त्या पाकीटावर अध्यक्षाने / सदस्याने तारखेसह सही करावी, असे बंद केलेले पाकीट समितीचे अध्यक्ष यांनी ताब्यात घ्यावे. याप्रमाणे अध्यक्षाकडे स्वतःचे व प्रत्येक सदस्याचे सिलबंद पाकीट राहील.

३) प्रस्तावित शेतीनिष्ठापैकी पहिल्या शेतकऱ्याचे अशा तऱ्हेचे कामकाज संपल्यानंतरच निवड समितीने प्रस्तावित केलेल्या दुसऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीस भेट दयावी आणि वर नमूद केल्याप्रमाणे तपासणी करुन, गुण देऊन गुणांचा तक्ता तयार करुन तारखेसह सही करुन पाकीटात सिलबंद करुन त्या पाकीटावर समितीच्या सदस्यांने व अध्यक्षांनी तारखेसह सही करावी, अशा तऱ्हेने प्रस्तावित केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे शेतीस भेट देऊन कामकाज करावे.

४) उपरोक्त कार्यवाही पूर्ण झाल्यावर शेतीनिष्ठ शेतकरी निवड समितीचे अध्यक्ष यांनी कृषि विषयक समितीची सभा सत्वर आयोजित करावी. या सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनाही आमंत्रित करावे. या सभेमध्ये शेतीनिष्ठ निवड समितीने सर्व प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे शेतीला भेट दिल्याबाबत आणि प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्याला गुण दिल्याबाबत आणि त्या अनुषंगाने गुणांचा तक्ता तयार केल्याची माहिती सभासदांना दयावी. सदस्य सचिव यांनी प्रत्येक सभासदाने भरलेली प्रत्येक प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांच्या गुणांचा तपशील असलेली सीलबंद पाकिटे समितीपुढे सादर करावीत. कृषि विषयक समितीचे अध्यक्षानी प्रत्येक पाकीट सीलबंद असल्याचे नमुद करुन प्रत्येक पाकीटावर तारखेसह सही

करावी आणि ही पाकीटे सदस्य सचिव यांनी समितीमध्ये सभासदांसमोर उघडावीत. उघडलेल्या सर्व गुणांच्या तक्त्यावर कृषि विषयक समितीच्या अध्यक्षानी ती पाहिली आहेत आणि त्यांचे समक्ष उघडली आहेत, असे प्रमाणित करुन तारखेसह सही करावी. अशा प्रकारे केलेल्या गुणांच्या तक्त्यांची एकत्रित गुणांची यादी सदस्य सचिव तसेच कृषि विकास अधिकारी यांनी सत्वर तयार करावी आणि ती त्याच दिवशी कृषि विषयक समितीस सादर करावी. कृषि विषयक समितीने एकत्रितरित्या केलेली गुणांची यादी तयार करुन गुणानुक्रम लावून प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा क्रम ठरवावा. शेतीनिष्ठ निवड समितीने अथवा अध्यक्षांनी या समितीतील सभासदांनी दिलेले गुणात कोणत्याही परिस्थितीत फेरफार करु नये. असे फेरफार केल्याचे आढळल्यास ती यादी रद्द समजण्यात येईल याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे १ ते ३ याप्रमाणे गुणानुक्रम लावल्यानंतर या यादीस कृषि विषयक समितीने मान्यता दयावी आणि अशी मान्यता झालेली प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुद्द त्यांच्या सहीने गोपनीय रित्या विभागीय कृषि सह संचालक यांना पाठवावी. प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांची जिल्हा परिषदेने केलेली शिफारस, आखणी केलेली कार्यपध्दती आणि कामकाज हे गोपनीय राहील याची खबरदारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्यांचे अधिनस्त काम करणारे अधिकारी यांनी घ्यावी. जिल्हा स्तरावर प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे गुणानुक्रमांची यादी मान्य होण्या अगोदर जर त्याबाबत माहिती बाहेर फुटली तर त्या जिल्हयातील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांची निवड रद्दबातल होईल, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

प्रस्तावित शेतकऱ्यांची संख्या कमी असल्यास त्याबाबतची कारणे "दयावीत, ती न दिल्यास प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही आणि त्याची सर्व जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

५) वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्हयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विभागीय स्तरावर नियुक्त केलेल्या समितीकडून छाननी करण्यात यावी. असे छाननी केलेले प्रस्ताव आवश्यकता

असल्यास प्रत्यक्ष भेटीव्दारे देखील तपासावेत व समितीचे शिफरशीसह गुणानुक्रमे १ ते ३ प्रस्ताव विभागवार आयुक्तालयास सादर करावेत.

**क) विभागीय स्तरावरील समिती :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय आयुक्त (महसूल) | - | अध्यक्ष |
| २) | विभागीय कृषि सह संचालक | - | सदस्य |
| ३) | विभागीय सह संचालक (पशुसंवर्धन) | - | सदस्य |
| ४) | अधिक्षक कृषि अधिकारी (वि.कृ.स.सं.यांचे कार्यालय) | - | सदस्य सचिव |

१) प्रस्तावासोबत सर्व कागदपत्रे जसे ७/१२ उतारा, चारित्र्य निर्दोष जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा दाखला इत्यादी सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे, अन्यथा असा अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हास्तरीय समितीची राहील.

२) एकापेक्षा जास्त वेळा शेतीनिष्ठ म्हणून शेतकऱ्याची निवड केली जाणार नाही याची खात्री करुन घ्यावी. तसेच सदर शेतकरी एखादया संस्थेकडून अगर शासनाकडून मानधन किंवा निवृत्ती वेतन घेत नाही याची खात्री करुन तसे अभिप्राय दयावेत.

३) दोन्ही गटाचे बाबतीत ५ किंवा त्याहून जास्त सालदार ठेवलेल्या शेतकऱ्यांची शिफारस करु नये.

४) प्रत्येक गटास ज्या तीन शेतकऱ्यांचा प्रस्ताव पाठविला जाईल त्या शेतकऱ्यांचे पासपोर्ट साईज तीन छायाचित्रे टाचणी न लावता पाकीटात घालून छायाचित्राच्या मागे सुवाच्य अक्षरात नांव, गांव, तालुका, जिल्हा व गटाचा (सर्वसाधारण / आदिवासी) उल्लेख करुन पाठवावेत.

५) प्रस्तावित शेतकऱ्यांचे संपूर्ण नांव व पत्ता प्रस्तावामध्ये प्रथमदर्शनी सुवाच्य अक्षरात लिहावा. प्रस्तावात अचूक/ संपूर्ण नांव न लिहिले गेल्यास सन्मान पत्र, परिचयपुस्तिका यामध्ये चुकीचे नांव लिहिले जाऊ शकेल, ही बाब कृपया लक्षात घ्यावी.

६) प्रस्तावित केलेल्या पहिल्या तीन क्रमांकाच्या शेतकऱ्यांचे परिचय लेख (थोडक्यात)स्वतंत्रपणे तयार करुन पाठवावेत. त्या शेतकऱ्यांनी केलेली पीकविषयक कामगिरी, जमिन सुधारणा,सुधारीत बियाणे,खते,किटकनाशके यांचा वापर, जोडधंदा, कंपोस्ट व रासायनिक खताचा वापर, गोबरगॅस प्लॅन्ट तसेच त्यांनी २००९-१०,२०१०-११,२०११-२०१२ मध्ये काढलेले पीक निहाय हेक्टरी उत्पादन, झालेला फायदा इत्यादी मुदयाचा समावेश असावा. परिचय लेख शेतकऱ्यांनीच स्वतः तयार करावेत.

शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. कृसंप्र-२१९३/सीआर-११६/११अे दि.२७.५.१९९४ सोबत जोडलेल्या प्रपत्रातील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांच्या निवडीच्या सुधारीत निकषाप्रमाणे तालुका व जिल्हा पातळीवरील त्यांच्या गुणामध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागणी करण्यात यावी. सदरील गुण त्या त्या स्तरावरील निवड समितीने दयावयाचे आहेत व त्यात जिल्हास्तरीय निवड समिती व विभागस्तरीय समिती यांनी फेर बदल करु नयेत.

कृषी विकासांसाठी उल्लेखनीय कामाबाबत कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाचे वतीने कृषी पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या व्यक्ति ,संस्थांचा पुनःश्च इतर कृषी पुरस्कारासठी प्रस्ताव प्राप्त होतात . अशा परिस्थितीत प्रस्तावाची गुणवत्तेनूसार शिफारस करतांना यापूर्वी देण्यात आलेल्या कृषी पुरस्कारास पाच वर्षाचा कालावधी झाला असल्याची खात्री करण्यात यावे
सोबत प्रपत्र / प्रमाणपत्र अ, ब व इतर सुचनापत्र सहपत्रे जोडलेली आहेत.

वरील मुद्दे लक्षात घेऊन त्याप्रमाणे परिपूर्ण प्रस्ताव दि.२५/०३/२०१३ पूर्वी विभागीय कृषि सह संचालक यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

सोबत :- प्रपत्र / प्रमाणपत्र अ, ब व इतर सूचनापत्र

स्वाक्षरित/-
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे ४११००५

प्रत :-

माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन), कृषि व प. दु. म. विभाग, मंत्रालय,मुंबई-३२

२. विभागीय कृषि सह संचालक (सर्व), यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- मागील वर्षाप्रमाणे या वर्षीही सन २०१२ या वर्षाचे सर्वसाधारण/आदिवासी

शेतीनिष्ठ शेतकरी यांचे प्रस्ताव विभागातील जिल्हा परिषदाकडून प्राप्त झाल्यावर विभागीय स्तरावर त्याची छाननी करुन गुणानुक्रम १ ते ३ प्रस्ताव शिफारशीसह विभागाने कृषि आयुक्तालयास सादर करावयाचे आहेत. गुणवत्ता तक्त्यातील तालुका व जिल्हा स्तरावर त्या त्या मु'दयाना दिलेल्या गुणात विभागीय स्तरावरील समितीने फेरफार करु नये. याबाबत सोबतच्या प्रपत्रात सविस्तर सूचना निर्गमित केल्या असून त्याप्रमाणे आपल्या स्तरावर प्रस्तावाची छाननी करुन प्रस्ताव कृषि आयुक्तालयास दि. २५/03/२०13 पर्यंत सादर होतील हे पहावे. प्रस्तावा सोबत पुढील प्रमाणे परिपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

१) प्रपत्र अ आणि ब मधील मुदयासंबंधीची माहिती त्या त्या मु'दयासमोर 'दयावी. (दोन स्वतंत्र प्रपत्रात माहिती असावी )
२) प्रपत्र ब मधील मुदयासमोर गुण देऊन गुणवत्ता तक्ता दयावा.
३) परिचय लेख
४) ७/१२ उतारा
५) प्रमाणपत्र अ
६) प्रमाणपत्र ब
७) लाभांकित शेतकऱ्याची यादी
८) चारित्र्य दाखला
९) फोटो (तीन प्रतीत)
१०) आदिवासी शेतकरी जातीचा दाखला
११) जन्मतारखेचा दाखला

प्रत :- ३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
प्रत :- ४) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

स्वाक्षरित/-
कृषि उपसंचालक ( माहिती )
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५

**शेतीनिष्ठ बहुमानाकरिता शेतकऱ्यांची निवड करण्याबाबत सूचना पत्र**

ज्या शेतकऱ्याबाबत शेतीनिष्ठ बहुमानार्थ शिफारस करावयाची आहे.त्यांचे संबंधी दोन प्रमुख बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

(१) अ) वैयक्तिक पात्रता

(२) ब) शेती धंदयांची पातळी

या दोन सदराखाली पुढील मुदयांचा विचार करावा.

(अ) वैयक्तिक पात्रताः-

१) शेतकऱ्याचे नांवे स्वतःची जमीन असावी.

२) शेतकरी आपल्या शेतीत स्वतःच शेतीची सर्व कामे उदा. नांगरणी ते मळणीपर्यंत करणारा असावा.

३) त्यांचे वास्तव्य शेतीच्या गांवात / शेतावर नेहमीकरीता असावे. शेतात कायमचे घर बांधून राहणाऱ्या शेतकऱ्यास प्राधान्य दयावे.

४) शिफारशीस पात्र असलेली व्यक्ती २५ ते ५५ वर्षाच्या वयोगटातील असावी. शेतीमध्ये किमान ४ वर्षे त्याने स्वतः परिश्रम व अनुभव घेतलेला असावा.

५) शेतकरी स्वतः साक्षर असावा व त्याच्या कुटुंबातील सर्व प्रौढ व्यक्ती साक्षर असाव्यात. मुलाच्या व मुलींच्या शिक्षणाकडे त्याने लक्ष दिलेले असावे.

६) शेतकऱ्याचे कुटूंब मर्यादीत असावे.

७) शिफारस करावयाच्या शेतकऱ्याची शेती त्यांच्या गावात व परिसरात आदर्श म्हणून ओळखली जात असावी. ही शेती आदर्श स्वरुपात आणण्याकरीता शेतकऱ्याचे स्वतःचे कष्ट, कल्पकता, नवे उपक्रम कारणीभूत झालेले असणे महत्वाचे आहे. शेती विभागामार्फत त्याच्या शेतीवर दरवर्षी प्रात्यक्षिके घेतली जात असावीत.

८) संबंधीत शेतकरी सर्वार्थाने स्वावलंबी असावा. त्याची शेती त्याच्या शेतावरील खर्च कुटूंबाचा चरीतार्थ, तसेच शेतीच्या जोड धंदयाचा खर्च वगैरे वजा जाता व्यवसायीक दृष्टया

फाय"दयाची असली पाहिजे, एकूण शेती किती आहे. औजारे, बैलबारदाना, बागायत किती, कोरडवाहू किती इत्यादी बाबी ठरविण्यासाठी जे मुद्दे नमुद केलेले आहेत, त्यामध्ये दिलेली माहिती सत्य असल्याचे निवेदन शेतकऱ्याकडून घेणे आवश्यक आहे. संबंधीत शेतकरी नोकरी करणारा किंवा दुकानदारी किंवा कारखानदारी करणारा नसावा.

९) शेतकरी कोणत्याही कर्जाबाबत सहकारी संस्थेचा, शासनाचा राष्ट्रीयकृत बँकेचा थकबाकीदार नसावा.

१०) शिफारस करण्यात येणारा शेतकरी त्याच्या आर्थिक परिस्थितीनुसार नियमित बचत करणारा काटकसरी असावा. शेतीच्या व्यवहारात उत्पन्नातून शेतकऱ्याने बँकेमध्ये, पोस्टामध्ये, रोखीमध्ये किंवा शासनाच्या इतर बचत प्रकारामध्ये आपली रक्कम ठेवलेली असावी.

११) संबंधीत शेतकऱ्याने अन्नधान्याच्या, नगदी पिकांच्या तसेच फळबाग पिकाच्या स्पर्धामध्ये भाग घेऊन पारितोषिक मिळवलेली असावीत.

१२) संबंधीत शेतकरी त्याच्या शेतीच्या प्रगतीबाबत आणि त्याच्या वैयक्तिक सुधारलेल्या शेती कार्यक्रमाबाबत त्याच्या खेडयामध्ये आदर्श व अनुकरणीय असावा. इतकेच नव्हे तर त्या शेतकऱ्याने त्याच्या शेतीवर केलेल्या विविध बाबींची प्रगती पाहून त्याचे गावातील तसेच जवळपासच्या गावातील शेतकऱ्यांनी त्याच्या शेतीत सुधारणा केली असल्याची खातरजमा झालेली असावी.

१३) त्याच्या निर्दोष चारीत्र्याबद्दल जिल्हा पोलिस अधिकाऱ्याकडून दाखला मिळवून तो प्रस्तावा बरोबर पाठवावा.

(ब) शेती धंदयाची पातळीः-

(१) शेतकऱ्याने शेती धंदयामध्ये स्वतःचे प्रयत्नांनी परिश्रमाने व स्वावलंबनाने प्रगती केलेली असावी.

पुढे नमुद केलेल्या प्रत्येक बाबतीत संबंधित शेतक-याने प्रगती साधली असली पाहिजे.

१. शेतकऱ्याने उत्तम प्रकारची जमीन सुधारणा केलेली असावी व जास्तीत जास्त पावसाच्या पाण्याचा वापर केलेला असावा.

२. शेतकऱ्याने जमिनीच्या मगदुराप्रमाणे पीक उत्पादन आराखडा तयार केलेला असावा आणि त्याचा वापर केलेला असावा.

३. शेतकरी नियमित व योग्य प्रकारे सेंद्रीय खताचा वापर करीत असावा.

४. शेतकरी हा विविध ठिकाणाहून मिळविलेल्या बियाण्याच्या चाचण्या घेणारा असावा.

५. शेतकऱ्याचे जमिनीचे व्यवस्थापन (उदा.जमिनीचा पोत आम्ल, विम्ल निर्देशांक जमिनीतील मुलद्रव्याचे उपलब्धतेनुसार रासायनिक पृथःकरणानुसार ) उत्तम प्रकारे केलेले असावे.

६. शेतक-याने पीक संरक्षण उपायाचा किफायतशीर व कमीत कमी खर्चात अवलंब केलेला असावा.

७. शेतकऱ्याने शास्त्रोक्त पध्दतीने शेती केलेली असावी व सुधारीत अवजारांचा वापर केलेला असावा.

८. शेतकरी हा शेतीला पुरक असे धंदे उदाः दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम तयार करणे, मधुमक्षिका पालन, मत्स्यव्यवसाय इत्यादीचा अवलंब किफायतशीर करणारा असावा.

९. हेक्टरी उत्पादनाची पातळी उच्चतम असावी.

१०. शेतकऱ्याने स्वप्रेरणेने लागवड करून शेतीत सुधारणा केलेली असावी.

११. प्रस्तावित शेतकऱ्यांने अवलंबिलेल्या मशागत पध्दतीचा वापर जवळपासचे शेतकरी करतात असा शेतकरी असावा.

१२. शेतकऱ्याने जर सहकारी कर्ज घेतले / सरकारी कर्ज घेतले असेल तर त्याची परतफेड योग्य हप्त्यात नियमित केलेली असावी.

१३. शेतकऱ्याने सिंचनाचे पाण्याचा कार्यक्षमरीत्या वापर करणे आवश्यक आहे.

१४. शेतकरी जैविक इंधन (बायोडिझेल), गोबर गॅस, सौरउर्जा, पवन उर्जा इत्यादी अपारंपारीक पध्दतीचा वापर करणारा असावा

**आदिवासी / सर्वसाधारण शेतकरी**

**जिल्हा**

**माहिती (प्रपत्र अ)**

**तक्ता**

शेतीनिष्ठ सन्मान योजना प्रस्तावित शेतकऱ्यांची सर्वसाधारण माहिती सन २०१२ करिता

विभाग.................... जिल्हा..........

| अ. क्र. | बाब | शेतकरी १ | शेतकरी २ | शेतकरी ३ |
|---|---|---|---|---|
| १ | शेतकऱ्याचे संपुर्ण नांव | | | |
| २ | गांव, पोस्टाचे नांव | | | |
| ३ | तालुका व पंचायत समिती | | | |
| ४ | जिल्हा | | | |
| ५ | अ) ई-मेल आय.डी.<br>ब) वेब साईट | | | |
| ६ | वय पूर्ण वर्ष (जन्मदाखला दयावा) | | | |
| ७ | शिक्षण (अतिरिक्त अर्हतेसह) | | | |
| ८ | मागासवर्गीय आदिवासी जाती/जमाती भटक्या/विमुक्त जातीपैकी असल्यास तपशिलवार माहिती दयावी. | | | |
| ९ | शेती व्यवसाय किती वर्ष करत आहेत. | | | |
| १० | प्रत्यक्ष शेतीवर राहतात काय ? | | | |
| ११ | शेतीच्या गांवात वास्तव्य आहे काय ? | | | |
| १२ | कुटुंबात एकूण माणसे किती<br>मोठी माणसे/पुरुष/स्त्रिया /मुलगे/मुली इत्यादी ? | | | |
| १३ | कुटुंबात शैक्षणिक पातळी काय आहे. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १) पत्नीचे शिक्षण<br>२) मुले व मुलीचे शिक्षण<br>३) इतर प्रौढ व्यक्तीचे शिक्षण | | | |
| १४ | लागवडीखाली एकूण क्षेत्र हेक्टर (पीकनिहाय)<br>१)बागायत (हेक्टर) व प्रकार<br>२)जिरायत (हेक्टर)<br>३)कुरण (हेक्टर)<br>४) एकूण क्षेत्र(पडीक धरुन हेक्टर मध्ये) | | | |
| १५ | सिंचन सुविधा- कॅनॉल/ विहीर/उपसा सिंचन /इतर | | | |
| १६ | सिंचन सुविधा हंगामी आहे की बारमाही आहे. | | | |
| १७ | अ) उत्पादित मालाची विक्री कोठे केली जाते?<br>गावामध्ये/तालुकास्तरावर/जिल्हास्तरावर/<br>राज्यामध्ये / देशामध्ये/निर्यात<br>ब) मालाच्या विक्रीची पध्दत.<br>कृषि उत्पन्न बाजार<br>समिती/शेतावर/शेतकरी<br>ग्राहक थेट विक्री/बागवान/करारशेती. | | | |
| १८ | काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो काय ? उदा. प्रतवारी/पॅकिंग इ. | | | |
| १९ | तंत्रज्ञानाचा वापर<br>अ) रेडिओ/दुरदर्शन<br>ब) कृषि विदयापीठ/ कृषि विज्ञान केंद्र.<br>क) कृषि विभाग/इतर विभाग<br>ड) इतर | | | |
| २० | शेतीमध्ये गेल्या ३ वर्षात निव्वळ खर्च, फायदा, किती झाला, २००९-२०१० मध्ये<br>एकूण उत्पन्न<br>खर्च----<br>फायदा--<br>सन २०१०-२०११ एकूण उत्पन्न<br>खर्च------ | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | फायदा---------<br>सन २०११-२०१२ मध्ये एकूण उत्पन्न<br>खर्च-------<br>फायदा---------- | | | |
| २१ | गेल्या तीन वर्षात खर्च धरुन निव्वळ फायदा किती होता?<br>जोडधं'दयाचे नांव (आकडे हजारात)<br>सन २००९-२०१०<br>२०१०-२०११<br>२०११-२०१२ | | | |
| २२ | २०११-२०१२ वर्षातील माणसी एकूण उत्पन्न रुपये | | | |
| २३ | एकूण उत्पन्नापैकी शेती जोडधंदा कुटुंबाचा खर्च वगळून शिल्लक किती ? कशात गुंतविली आहे ? | | | |
| २४ | कर्जाची थकबाकी किती ? प्रकार (रुपयात)<br>१)सहकारी बँक/राष्ट्रीयकृत बँका<br>२)सरकारी तगाई (बॅकनिहाय महिती दयावी) | | | |
| २५ | पीक स्पर्धेत मिळालेल्या बक्षिसाचे प्रकार कोणत्या वर्षी, त्यात काढलेले हेक्टरी उत्पादन. | | | |
| २६ | कोणत्या संस्थेचा पदाधिकारी आहे ? | | | |
| २७ | शेती मधील एकुण कामकाजाचा हिशोब ठेवतात का? | | | |
| २८ | हंगाम निहाय वार्षिक नियोजन आराखडा तयार करतात का ? असल्यास आराखडा देण्यात यावा. | | | |
| २९ | यांत्रिकीकरणाचा वापर व स्वरुप<br>(अवजारे व वापर इ.) | | | |

**प्रपत्र ब**

**विशेष सूचनाः-सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे तक्ते वापरावे व प्रत्येकी तीन शेतकऱ्यांची शिफारस करावी. शेतीनिष्ठ पुरस्कारार्थ निवडावयाचे शेतकऱ्यासंबंधी त्यांचे शेती धंदयातील पातळी बाबतच्या मुदयावरील माहितीचे संकलन करुन तपशिल त्या त्या पातळीवर भरावा.**

शेतीनिष्ठ शेतकरी (गेल्या चार वर्षात केलेल्या कामाची माहिती दयावी)

शेतकरी गट --------------

प्रस्तावित शेतकऱ्याचे नांव व पत्ताः-

| अ. क्रं. | नविन सुधारीत सूचविलेले निकष | एकूण गुण | तालूका पातळी | जिल्हा पातळी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) जमिनीचा विकास व फळबाग लागवड करणे<br>ब) धुळ पेरणी / कंटूर पध्दतीने करणे/आंतर मशागतीचे वेळी २ ते ३ ओळीनंतर चर काढणे/मुलस्थानी जल-मृद संधारण.<br>क) विहिर नाला अडवून/शेतीतील नालाबंडीग इत्यादी व पाण्याचा उपयोग.<br>ड) हलक्या जमिनीत कोरडवाहू फळझाडे/निलगिरी, सुबाभूळ स्टायलो गवत लागवड केली आहे काय१ | २५<br>२५<br>२५<br>२५ | १०<br>१०<br>१०<br>१० | १५<br>१५<br>१५<br>१५ |
| २ | जमिनीच्या मगदुराप्रमाणे पिकाची लागवड करणेः-<br>१) भु-पर्जन्य गटाप्रमाणे पीक उत्पादन आराखडा तयार केला आहे काय १<br>२) आराखडयाप्रमाणे प्रत्यक्षात लागवड केली आहे काय१<br>३) आराखडयाप्रमाणे निविष्ठा व्यवस्था<br>१.बँक कर्ज २. सोसायटी ३. स्वतःचे | २५<br>२५<br>२५ | १०<br>१०<br>१० | १५<br>१५<br>१५ |
| ३ | अ)हिरवळीचे खत किती क्षेत्रावर घेतले१<br>ब)कंपोष्ट खत तयार करतात काय१<br>सेंद्रीय पदार्थाचा खतामध्ये दरवर्षी वापर करतात काय१<br>असल्यास त्याची व्याप्ती / गांडूळ शेती<br>क)अॅझो/रायझो/पीएसबी/बीजीए किंवा हिरवळीची खते यांचा | २५<br>७५<br>२५ | १०<br>३०<br>१० | १५<br>४५<br>१५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वापर/रासायनिक खतांचा वापर करतात काय१ | | | |
| ४ | संकरीत व सुधारीत जातीच्या बियाण्याचा वापर /बियाणे बदलण्याचा कालावधी (दरवर्षी/२ वर्षानंतर/३ वर्षानंतर) | ५० | २० | ३० |
| ५ | मातीचे नमुने तपासून त्याप्रमाणे रासायनिक खताचा वापर (मृद परीक्षण अहवाल व त्यानुसार वापर तपासावे) | ५० | २० | ३० |
| ६ | पीक संरक्षण औषधे वेळेवर व योग्य प्रमाणात वापरावे<br>१)शेतकऱ्यांना/प्रमुख किड व रोगाची माहिती सांगता येते काय१<br>२)एकात्मिक पीक संरक्षण कार्यक्रम राबवतात काय१ | ५०<br>५० | २०<br>२० | ३०<br>३० |
| ७ | सुधारीत शेती औजारे तव्याचा कुळव, दुचाडीपाभर कोळपणी यंत्र, मल्टीपरपज टुल बार, सुधारीत विळा, बहुपीक मळणीयंत्र, बीजप्रक्रीया ड्रम, भुईमुग शेंगा सोलणीयंत्र, सुर्यफुल मळणीयंत्र, ग्राऊंडनट डिगर, मॅन्यूअल फिडर, रीजर. | २५ | १० | १५ |
| ८ | शेतीला पुरक धंदे- १)कुकूटपालन २)दुग्धव्यवसाय ३)रेशीम तयार करणे ४)मधुमक्षिका पालन ५)मत्स्यव्यवसाय इ. | ५० | २० | ३० |
| ९ | पीकनिहाय चार वर्षातील प्रतिहेक्टर उत्पादन जिल्हास्तरावरील सरासरीपेक्षा किती टक्के जास्त आहे.<br>१.संकरीत ज्वारी २.भात ३.भूईमूग ४.तुर ५.गहू ६.करडई ७.सुर्यफुल ८.कापूस ९.ऊस १०.बाजरी ११.सोयाबिन १३. हरभरा इ. | १०० | ४० | ६० |
| १० | शेतकऱ्यांनी कृषि तंत्रज्ञानविषयक बाबी अवगत करण्यासाठी केलेले प्रयत्न जसे कृषि विदयापिठे कृषि प्रतिष्ठान व तत्सम संस्था भेटी किंवा संपर्क करुन तेथील तंत्रज्ञानाचा अवलंब | ५० | २० | ३० |
| ११ | स्वतःचे कल्पनेने व विस्तार यंत्रणेचे सल्याने नविन प्रकारे लागवड करणे उदा.हेक्टरी बियाणे/रोपांची संख्या/मिश्रपीक सुर्यफुल, करडई व तुरीचा सलग पेरा इ. | ५० | २० | ३० |
| १२ | शासनाची तसेच सहकारी संस्थाकडील कर्जाची परतफेड करणे<br>१)कर्जसंस्था निहाय नियिमत परतफेड करतात काय१<br>थकबाकी करणे. | ५० | २० | ३० |
| १३ | सिंचनाचे पाण्याचा किफायतशीर वापर<br>१.स्प्रिंकलर व ठिबक पध्दती इत्यादी. | ५० | २० | ३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १४ | गोबर गॅसयंत्र, सौर शक्ती, निर्धूर चुली, पवनचक्की इ. अपारंपारीक साधनांचा वापर करतात काय ? | ५० | २० | ३० |
| १५ | अ)सामाजिक कार्यः<br>१)गावातील शेतीमध्ये एखादी योजना/तंत्र/विकसीत करणे/प्रचार करणे २)जिनिंग प्रेसिंग<br>३)कृषि प्रशिक्षण क्षेंत्र<br>४)कुटुंबनियोजन आरोग्य क्षेत्र<br>५)अल्पबचत<br>६)सहकारी संस्था, ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद पद | १० | ४ | ६ |
| | ब)पीक स्पर्धेत भाग घेणे/शेतकरी मासिक व इतर शेतीसंबंधी नियतकालीके/मासिकाचे वर्गणीदार आहेत काय ?<br>टि.व्ही.रेडीओवर शेती व इतर पुरक धंदया विषयीचे कार्यक्रम पाहतात काय ? | १५ | ६ | ९ |
| १६ | शेतकरी त्यांच्या कुटुंबियांच्या समवेत त्यांचे शेतावर कायम वास्तव्य करुन राहतो काय? | ५० | २० | ३० |
| | एकूण | १००० | ४०० | ६०० |

**प्रमाणपत्र ब**

आम्ही जिल्हास्तरीय शेतीनिष्ठ शेतकरी निवड समितीचे सदस्य, प्रमाणित करतो की, सन.......................................................या वर्षासाठी.................................. शेतकऱ्यांची शिफारस केली असून सदरच्या शेतकऱ्यांचे शेतावर प्रत्यक्ष जाऊन आम्ही शेतीची पाहणी केली असून प्रस्तावीत सर्व शेतकऱ्यांच्या समक्ष भेटी घेतल्या आहेत. प्रस्तावित सर्व शेतकरी हे प्रत्यक्ष शेती करतात, त्यांचे नावावर जमिन आहे, ते शेतीच्या गांवात राहतात, शेतीस पूरक धंदा व्यतिरिक्त ते इतर कोणताही धंदा /नोकरी करीत नाही, याची आम्ही स्वत: खात्री करुन घेतली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही..................... कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सदस्य सचिव | सही..................... जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सदस्य | सही..................... जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सदस्य | सही..................... जिल्हा कृषि विषयक समितीचे सभापती, अध्यक्ष |

**प्रमाणपत्र अ**

प्रस्तावितशेतकरीश्री./श्रीमती.........................................................................राहणार.......................तालूका.........................................जिल्हा.......................................हे / ही शेती करणारा / करणारी शेतीच्या गावी राहणारा / राहणारी स्वत:चे नावावर जमिन असणारा / असणारी असून तो / ती शेतीस पूरक धंदा / नोकरी करत नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| सही.................... तालुका कृषि अधिकारी, सदस्य सचिव | सही..................... कृषि अधिकारी, पंचायत समिति, सदस्य | सही.................... गट विकास अधिकारी पंचायत समिती, सदस्य | सही.................... सभापती, पंचायत समिती, अध्यक्ष |

| |
|---|
| सही....................... <br>सदस्य सचिव, कृषि अधिकारी <br>(पंचायत समिती) |